# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी

दिनांक:- ३१/१२/२०२४.

**<u>सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप.</u>**

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार १६ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी महानगरपालिकेचे मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या हस्ते सदर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे धनादेश पत्र, शाल व पुस्तक देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमातीच्या तिसरा मजल्यावरील कॉन्फ़रन्स हॉल येथे संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात १) श्री. अशोक बाळाराम थेटे (लिपीक), २) श्रीम. मीना नारायण तांबे (लिपीक), ३) श्री. अनिस गुलाब मोमीम (वाहनचालक), ४) श्री. अरुण चाऊ जाधव (सफाई कामगार), ५) श्री. दिनेश चंद्राकांत चव्हाण (सफाई कामगार), ६) श्रीम. ताराबाई हरिचंद्र वाणी (सफाई कामगार), ७) श्री. सुभाष लोल्या जाधव (सफाई कामगार), ८) श्री. नारायण तुळशिराम जाधव (सफाई कामगार), ९) श्री. राजेश गोविंद जाधव (सफाई कामगार), १०) श्री. अनिल विठ्ठल जाधव (सफाई कामगार), ११) श्री.धर्मेंद्र काशिराम सकपाल (सफाई कामगार), १२) श्री. गणेश तुकाराम साळवी (सफाई कामगार), १३) श्री. जनार्दन मंगल्या जाधव (सफाई कामगार), १४) श्री. दयानंद बाबु गायकवाड (सफाई कामगार), १५) श्री. तुकाराम शंकर वाणी (सफाई कामगार), १६) श्रीम. सुशिला सुरेश जाधव (सफाई कामगार), अशा १६ कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यात आला. याप्रसंगी मा. सहा. आयुक्त (प्रशासन) तथा अंतर्गत लेखा परिक्षक श्री. नंदकुमार चौधरी, आस्थापना विभाग प्रमुख श्री. राजेश गोसावी, पर्यावरण विभाग प्रमुख श्री. अनिल आव्हाड व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

(श्रीकांत परदेशी)
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका